मुंबई विद्यापीठ

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

वेबसाईट :-www.nssmu.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.**

पत्र.क्र.रासेयो/ईसीडी/२०२३-२४/३११

दिनांक : ०६ सप्टेंबर, २०२३.

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : मा. मंत्रीमहोदय यांनी आदेशित केल्याप्रमाणे '' मेरी माटी मेरा देश '' कार्यक्रमातंर्गत अमृत कलश संकलन करणेबाबत.**

**संदर्भ :** रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र.रासेयो-२०२३/प्र.क्र.१७१ /साशि-७, दिनांक ०६ सप्टेंबर, २०२३ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयानुसार मा. मंत्रीमहोदय श्री. चंद्रकात (दादा) पाटील, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली सर्व रासेयो संचालक तथा समन्वयकांच्या बैठकीत व दि. २५ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या मा. कुलगुरूंच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे मा. मंत्री महोदयांनी आदेशित केल्याप्रमाणे खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे '' **मेरी माटी मेरा देश** '' हा उपक्रम राबविण्यात यावा.

१. **दिनांक ०६ ते २१ सप्टेंबर, २०२३** या कालावधीत विद्यार्थ्यांनी एक मूठ माती गोळा करून हातात माती घेऊन ती अमृत कलशामध्ये टाकतानाचा सेल्फी काढावा व तो पुढे दिलेल्या लिंकवर अपलोड करावा. https://selfiewithmerimaati.in/photoupload/
२. **दिनांक ०३ ते १३ ऑक्टोबर, २०२३** या कालावधीत प्रत्येक महाविद्यालयात किमान ७५ रोपांची अमृत वाटीका/अमृत वन/ अमृत कोपरा/अमृत कुंडी/अमृत गार्डन तयार करण्यात यावे
३. **दिनांक १४ ते २० ऑक्टोबर, २०२३** संकलिक केलेल्या मातीचा एक कलश तालुक्याच्या ठिकाणी निर्देशीत केलेल्या एका महाविद्यालयात जमा करण्यात यावा.
४. **दिनांक २८ व २९ ऑक्टोबर, २०२३** रोजी प्रत्येक तालुक्याचा एक कलश असे महाराष्ट्रातील सर्व तालुक्याचे कलश मुंबई येथे एकत्रित करण्यात येतील.

त्यानुषंगाने विद्यापीठातंर्गत सर्व महाविद्यालयात वरील वेळापत्रकाप्रमाणे सदरील उपक्रम राबविणे बाबत योग्य ते नियोजन करण्यात यावे.

**''मेरी माटी मेरा देश''** या उपक्रमाची गिनीज बुक वर्ल्ड रेकार्ड मध्ये नोदं करण्याचा मानस असल्यामुळे सर्वांचा सहभाग (रासेयो स्वयंसेवक/विद्यार्थी/मित्र/कुटुंब सदस्य/नातेवाईक इ.) अपेक्षित आहे. उपक्रम यशस्वीपणे राबवून त्याबाबतचा प्रगती अहवाल दर गुरूवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंत विद्यापीठास सादर करण्यात यावा.

**आपला**

**सुशील शिंदे**
**विशेष कार्य अधिकारी, (रा.से.यो.)**

**- - - sd - - -**
**सुधीर पुराणिक**
**संचालक, रा.से.यो., मुंबई विद्यापीठ**

**प्रत : रासेयो जिल्हा समन्वयक यांनी आपल्या परिक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये सदर उपक्रम राबविण्या बाबत मार्गदर्शन करण्यात यावे व कार्यक्रमाचा अहवाल तयार करण्यात यावा.**